महाराष्ट्र टाइम्स 19-1-2022

# ‘वैकुंठ मेहता’ संस्थेचा वर्धापनदिन उत्साहात

म. टा. प्रतिनिधी, पुणे

गणेशखिंड रस्त्यावरील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेचा (व्हॅम्निकॉम) स्थापना दिन नुकताच साजरा करण्यात आला.

या वेळी रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय मंडळाचे संचालक सतीश मराठे आणि राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघाचे (नाफेड) व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार चड्ढा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात संस्थेचे संचालक, निबंधक, प्राध्यापक, कर्मचारी यांनी प्रत्यक्ष आणि विद्यार्थ्यांनी ऑनलाइन सहभाग घेतला.

शेती, सहकार आणि ग्रामीण विकासासाठी बौद्धिक केंद्र म्हणून कार्यरत असलेल्या या संस्थेद्वारे व्यवस्थापन विकास, प्रशिक्षण, संशोधन व सल्लामसलतीच्या माध्यमातून सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन प्रणालीचे सक्षमीकरण केले जात आहे. संस्थेतर्फे पदवीधारकांसाठी कृषी व्यवसाय व्यवस्थापन विषयात दोन वर्षे पूर्ण वेळ अभ्यासक्रम, सहकारी व्यवसाय व्यवस्थापन अभ्यासक्रम, सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी संगणक संचालन व व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम राबविण्यात येतात.



संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त उपस्थित कर्मचारी वृंद.